सत्यमेव जयते


**महाराष्ट्र शासन**

ग्रामविकास विभाग

५ वा मजला,बांधकाम भवन,

२५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४००००१

Email : rdd.bandhkam1-mh@gov.in


---

क्रमांक : माअअ-२०२३/प्र.क्र.४११/बांध-१ दिनांक : २४ जुलै, २०२५

प्रति

कक्ष अधिकारी,
माहिती तंत्रज्ञान कक्ष,
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई-०१

विषय : राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या दि.३०.४.२०२५ रोजीच्या आदेशांची अंमलबजावणी बाबत.

संदर्भ : १. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचे दि.३०.४.२०२५ रोजीचे आदेश
२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (प्रमग्रासयो) महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नाशिक यांचे पत्र क्र.प्र.मा.ग्रा.स.यो/ नाविना/ आस्था/ ३५३/ २०२५, दि. २०.६.२०२५

श्री.राकेश पी.सोमवंशी, सिनियर जर्नालिस्ट यांनी राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्याकडे दि.२०.११.२०२३ रोजी केलेल्या द्वितीय अपिलामध्ये संदर्भाधीन क्र.१ येथील आदेशान्वये सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वर्षाच्या रस्त्यांच्या कामांची कार्यारंभ आदेशाची प्रत माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ अनुसार ३ महिन्याच्या आत कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याबाबत आदेशित केले आहे.

२. त्यानुसार, उक्त कामांचे कार्यारंभ आदेश संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये झालेले आहेत. सदर कार्यारंभ आदेश सोबत जोडले असून ते विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याची कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

सोबत : वरील प्रमाणे

आपला,

(स्वाक्षरी) २४/०७/२०२५

(अच्युत इप्पर)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. कक्ष अधिकारी, मा. राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ, १३ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-३२ यांना वरील वस्तुस्थिती मा.राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्या निदर्शनास आणून देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (प्रमंग्रासयो), म.ग्रा.र.वि.संस्था, नाशिक मंडळ, नाशिक.

D:\Gabhale 2025\RTI\प्र.क्र. 411-2023 राकेश सोमवंशी.Docx

निर्गमित केले
दिनांक:- 24/07/25
सही:- (स्वाक्षरी)


Scanned with OKEN Scanner

कार्यालयअधीक्षकअभियंता,
प्रधानमंत्रीग्रामसडकयोजना,
महाराष्ट्रग्रामीणरस्तेविकाससंस्था,नाशिकमंडळ
बॅरेकनं.7,महसूलआयुक्तकार्यालयपरिसर,
नाशिकरोड-422101
☎ ०२५३-२४६३२३८
फॅक्स-0253-2455027

Office of the Superintending Engineer,
Pradhan Mantri Gram Sadak Yojana,
Maharashtra Rural Roads Development Association,
Nashik Circle,Barrack No. 7, Revenue Commissioner Office Campus,
Nashik Road422101
☎ 0253- 2463238
Fax.0253- 2455024
E-mail:~ mh-senas@pmgsy.nic.in

जा.क्र.प्र.मं.ग्रा.स.यो./नाचिना/आस्था/353/2025 दिनांक- 20/06/2025

प्रति,
पक्ष अधिकारी,
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन, 5 वा मजला,
25 मर्जबान रोड, फोर्ट, मुंबई.

**विषय:-** माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत व्दितीय अपील
श्री. राकेश पी. सोमवंशी, सिनियर जर्नलिस्ट.

**संदर्भ :-** 1) आपले पत्र क्र. माअअ-2023/प्र.क्र.411/बांध-1, दि. 28/05/2025.
2) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, प्रमंग्रासयो, नाशिक यांच्या कडील पत्र क्र. प्रमंग्रासयो/आस्था/मा.अ./272/2025, दि. 29/05/2025.
3) मा. राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र बृहन्मुंबई खंडपीठ यांचे अपील आदेश क्र. MHSICMU/2023/M/003482, दि. 28.04.2025

उपरोक्त विषयाच्या अनुशंगाने सादर करण्यात येते की, संदर्भीय पत्रान्वये आपण मला दि. ३०/०५/२०२५ रोजी मुंबई येथे आपल्या कार्यालयात उपस्थित राहणेबाबत कळविल्यानुसार सदर तारखेस मी उपस्थित होतो. तसेच संदर्भीय पत्र क्र. ३ अन्वये मा. राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र बृहन्मुंबई खंडपीठ यांचे अपील आदेशामध्ये अहमदनगर, धुळे, नंदुरबार, नाशिक या चार जिल्हयांचे सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षाच्या रस्त्याच्या कामांची कार्यारंभ आदेशाची प्रत माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ अनुसार ३ महिन्यांच्या आत कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करावी असे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (८) (a) (iii) मधील तरतुदीनुसार आदेशित करण्यात आले आहे. त्यानुसार या विभागाअंतर्गत सदर चार जिल्हयाकडुन कार्यारंभ आदेशाच्या प्रती या कार्यालयास प्राप्त झाल्या असुन सदरच्या प्रती पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव सादर करण्यात येत आहे.

सोबत – वरील प्रमाणे

(टी.जी.पगारे)
जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता
प्रधानमंत्री ग्रामसडक योजना
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था
नाशिक मंडळ नाशिक

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

ग्राम विकास विभाग (नों.शा)
नस्तीचे नाव : अधि-१
दिनांक: 20 MAY 2025
ई आवक क्र. 8365053
आवक 226

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००३४८२**

**अपिलार्थी श्री. राकेश सोमवंशी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (बांध-१)**
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ०१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव**
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ०१

लिपिक
राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई
१३ वा मजला नवीन प्रशासकीय भवन
मंत्रालय, मुंबई ४०००३२

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०४.२०२५**

बांधे-१

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्ट नुसार दि. ११.०४.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०८.०९.२०२३ | १३.०९.२०२३ | १२.१०.२०२३ | ०७.११.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २०.११.२०२३ रोजीच्या अर्जान्वये योग्य माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १३.०९.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०७.११.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. ०८.०९.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार निविदा क्र. ४ इ.स. २०२२-२३ अहमदनगर, धुळे, नंदुरबार, नाशिक या रस्त्याच्या कामाची साक्षांकित होऊन पारित झालेल्या कार्यारंभ आदेशाची प्रत मिळणेबाबत माहिती विचारलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१३.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, अपिलार्थी यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी, अधिक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांच्याशी संबंधित असल्याने अपिलार्थी यांचा माहिती अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(३) अन्वये संबंधित विभागाकडे हस्तांतरित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी दि. १२.१०.२०२३ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.११.२०२३ रोजी अपिलार्थी यांनी अधिक्षक अभियंता प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांच्या कार्यालयातील प्रथम अपिल अधिकारी यांच्याकडे अपिल दाखल करावे असे आदेश देऊन अपिल निकाली काढलेले आहे.

..२/-

Scanned with OKEN Scanner

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. २८.०४.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगासमोर सादर करुन असे नमूद केले की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत तरतुदीनुसार विहित कालावधीत कार्यवाही केलेली आहे.

अपिलार्थी यांनी निविदा क्र. ४ इ.स. २०२२-२३ अहमदनगर, धुळे, नंदुरबार, नाशिक या रस्त्याच्या कामाची साक्षांकित होऊन पारित झालेल्या कार्यारंभ आदेशाची प्रत मिळणेबाबत माहिती अर्ज केला होता. अशा सर्व कार्यारंभ आदेशांची प्रत सर्वोच्च न्यायालयाने Writ Petition (Civil) No. ९९० of २०२१ मध्ये दि. १७.०८.२०२३ रोजी दिलेल्या आदेशानुसार तसेच माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ अनुसार संबंधित विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना हव्या असलेल्या रस्त्याच्या कामांची पारित झालेल्या कार्यारंभ आदेशाची प्रत आदेशप्राप्तीच्या १५ दिवसात अपिलार्थींना नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात यावी. तसेच, जन माहिती अधिकारी, कक्ष अधिकारी (बांध-१), ग्राम विकास विभाग व जन माहिती अधिकारी अधिक्षक अभियंता प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांना सन २०२२-२३, सन २०२३-२४, सन २०२४-२५ या वर्षांच्या रस्त्याच्या कामांची कार्यारंभ आदेशाची प्रत माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ अनुसार ३ महिन्यांच्या आत कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करावी असे त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (८) (a) (iii) मधील तरतुदीनुसार आदेशित करण्यात येत आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास
30-4-2025

**मुंबई**
**दिनांक : ३०.०४.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

प्रत : जन माहिती अधिकारी, अधिक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नाशिक विभाग, नाशिक.

Scanned with OKEN Scanner